ISSN 0976-0377
RNI. MAHMUL02805/2010/33461

International Registered & Recognized
Research Journal Related To Higher Education for all Subjects

INTERLINK RESEARCH ANALYSIS
IRA

INTERLINK RESEARCH ANALYSIS

Editor In Chief
Dr. Balaji Kamble

INDEX

Sr. No	Title for Research Paper	Page No
1	Global life Insurance Industry: Concerns and Promises **Dr. P. T. Pawar**	1
2	Dielectric Study of Acetonitrile-Dichloromethane Mixture at Microwave Frequency **I. G. Shere**	11
3	Nutritional problems in Rural Community of Latur Districts children **Dr. J. K. Waghmare**	15
4	Preparation of Norms for the School going boys between 11 To 14 Years of age in different body Composition and Motor Qualities of Solapur District **Dr. Suresh Bhosale**	23
5	भूमण्डलीकरण के संदर्भ में हिंदी **डॉ. कांचनमाला बाहेती**	31
6	बकरी - समसामायिक युगीन अनुभूति की अभिव्यक्ति **श्रीमंत जगन्नाथ गुंड**	35
7	अब्दुल्ला दीवाना नाटक में नैतिक मूल्य **डॉ. राजू शेख**	40
8	डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे कामगार विषयक योगदान - एक अध्ययन **डॉ. डी.के. कदम**	43
9	धर्म आणि धर्माची कार्य याचा समाजशास्त्रीय अभ्यास **डॉ. जितेंद्र कोकणे**	48

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे कामगार विषयक योगदान - एक अध्ययन

डॉ. डी.के. कदम
समाजशास्त्र विभाग प्रमुख,
हुतात्मा जयवंतराव पाटील महाविद्यालय,
हिमायतनगर, जि. नांदेड

8 Research Paper-Sociology

प्रस्तावना:

भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार, भारतरत्न, पुरुष डॉ. बाबासाहेब आंबेडकर सर्वज्ञात आहेत. एक प्रख्यात राज्यशास्त्रज्ञ, समाजशास्त्रज्ञ, पत्रकार, समाज सुधारक, क्रांतिकारक आधुनिक भारताचे शिल्पकार १९ व्या शतकातील योग पुरुष आशा विविध अंग प्रतिमा सामान्य माणसाच्या मनामनामध्ये रुजलेली दिसते त्यांच्या उत्तुंग व्यक्तिमत्व सर्वसामान्य नागरिकापर्यंत पोहोचलेला पैलू म्हणजे ते एक महान अर्थतज्ज्ञ होते. स्वतंत्र भारतातील त्यांच्या समकालीन विचारांमध्ये त्यांच्या एवढा आर्थिक समस्यांचा अभ्यास कोणीही केलेला दिसत नाही, त्यांची आर्थिक विचार हे देशात पायाभूत सुधारणा करून संपूर्ण देश उभा करण्यामध्ये मोलाचे ठरतात. त्यात शेतीविषयक विचार, शेतकरी, शेतमजूर रोजगार, निर्मिती व्यापार धोरण, वित्त नियमांचे धोरण, नदीजोड प्रकल्प विद्युत निर्मिती केंद्र, राज्य वित्तीय संबंध हे मुलगामी विचार वाचून त्यांच्या चिकित्सक विकासात्मक काळाच्याही पुढे विचार करण्याचा दृष्टिकोनाचा परिचय होतो, त्यांचे अनेक विविध विचार असले तरी प्रस्तुत शोधनिबंधामध्ये

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या कामगार कल्याण विषयक योगदान :

एक अध्ययन याचा सविस्तर आढावा घेण्याचा प्रयत्न केलेला आहे.

अध्ययनाचा उद्देश:

१) डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची अर्थतज्ज्ञ म्हणून ओळख करून घेणे.

२) कामगार कल्याण चा अर्थ आणि स्वरूप जाणून घेणे.

३) सध्या स्थितीत कामगार कल्याण धोरणावर आंबेडकरांच्या विचारकृतीचा प्रभाव अभ्यासणे.

संशोधन पद्धती :

प्रस्तुत शोधनिबंधासाठी तथ्य संकलन करताना द्वितीय संकलन पद्धतीचा उपयोग करण्यात आला आहे त्यात संदर्भ ग्रंथ, मासिके, वर्तमानपत्रे, विविध संकेतस्थळावरील माहिती व तसेच

पुस्तके यांचा उपयोग केला आहे.

संशोधन आराखडा: प्रस्तुत शोधनिवंधाकरिता वर्णनात्मक संशोधन आराखड्याचा अवलंव केला आहे.

शोधनिवंधाची मर्यादा :

प्रस्तुत शोधनिवंधात पूर्णता प्राप्त द्वितीय तृतीय संकलनाच्या स्त्रोतावर अवलंवून आहे. डॉक्टर वावासाहेव आंवेडकर यांनी कामगाराचा अर्थ पुढीलप्रमाणे सांगताना असे म्हटले आहे की उच्च किंवा निम्न अशा कोणत्याही स्तरावरील आर्थिक क्रियांमध्ये गुंतलेल्या व त्याद्वारे राष्ट्रीय उत्पन्न उत्पादनात भर घालणाऱ्या सर्व व्यक्तींना कामगार असे म्हणतात. ज्या व्यक्ती आपल्या मिश्रणाच्या मोवदल्यात पैसा किंवा इतर तत्सम वस्तू प्राप्त करतो; त्यावर आपला उदरनिर्वाह करतो अशा व्यक्तीला श्रमिक किंवा कामगार संवोधतात. वावासाहेव आंवेडकरांच्या मते या कामगारांचे कल्याण होणे हे अतिशय महत्त्वाचे आहे. स्वातंर्त्यप्राप्तीनंतर भारतात औद्योगीकरण नागरिकरण यांत्रिकीकरण या प्रक्रियेमुळे कामगार कल्याण या घटकाला देशात अत्यंत महत्त्व प्राप्त झाले आहे डॉक्टर वावासाहेव आंवेडकर यांच्या मते कामगारांची कल्याण म्हणजेच कामगारांच्या कर्मचा?्यांच्या आरोग्य आणि दृष्टिकोनांची संवर्धन करणे म्हणजेच सेवकांच्या कार्याची संगोपन करणे होय कामगारांचे मनोधैर्य राखण्यासाठी ही वाव अतिशय महत्त्वाची आहे. (जाधव तुकाराम शिरपूरकर महेश मानवी हक्क) युनिक अकॅडमी कामगार कल्याण आत कामगारांसाठी पुरेशी उपाय घरे आराम आणि मनोरंजनाच्या सुविधा कामाच्या ठिकाणी जाणे येणे करण्यासाठी प्रवासाची सोय निवासापासून कामाचे ठिकाण दूर अंतरावर असेल तर कामगारांना राहण्याची सोय इत्यादी सेवा; सुई सुविधा असणे आणि कामगाराच्या कामाची स्थिती सुधारण्यासाठी सहाय्य ठरणाऱ्या इतर अशा सेवा सुविधा होत; कल्याणकारी उपायांचा कामगारांच्या भावनिकतेवर. आणि औद्योगिक शांतता राखण्यासाठी. कल्याणकारी उपायामुळे मनोधैर्य सुधारणे आणि निष्ठा वृद्धीनंतर होण्यावरोवरच अनुपस्थिती आणि कामगाराचे एका उद्योगाकडून दुसऱ्या उद्योगाकडे असे रोजगार स्थलांतरण घडते. त्याचवरोवर कल्याणकारी उपायामुळे संवंधित उद्योगाची आणि मालकाची प्रतिमा. परिणामी या उद्योगातील भरतीला कामगारांचा मोठा प्रतिसाद मिळतो म्हणून डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या मते कामगारांची कल्याण होणे हा त्यांचा दृष्टिकोन अतिशय महत्त्वाचा दिसून येतो.

डॉक्टर वावासाहेव आंवेडकरांनी अत्यंत महत्त्वपूर्ण दृष्टीने अनेक विचार मांडले आणि त्याला अनुसरून सामाजिक सुरक्षिततेचे कायदे देखील केली. डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांनी स्वातंर्त्यपूर्व काळापासून स्वतंत्र व सक्षम भारताची उभारणी करण्यासाठी ज्या ज्या आवश्यक वावी आहेत त्यांची पायाभरणी उभारणी त्यासाठी कायद्यात तरतुदी केलेल्या आढळून येतात कामगार हा अतिशय महत्त्वाचा घटक समोर ठेवून त्यांनी कामगार नेता मजूर मंत्री आणि स्वतंत्र मजूर

पक्षाचा संस्थापक या नात्याने डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांनी शेतकरी शेतमजूर कामगार इतर मजुरांना न्याय मिळवून देण्याचा अथक यशस्वी प्रयत्न केला हे त्यांच्या कामगार कल्याण विषयक दृष्टिकोनावरून स्पष्ट दिसून येते. डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर म्हणतात कामगारांनी कामगार संघटना स्थापन करण्याची आवश्यकता आहे भारतातील कामगार हा प्रामुख्याने ग्रामीण भागातील आहे तो शेतीशी संबंधित अधिक श्रमाचे काम करतो तो शहरात आल्यानंतर त्यांची बेरोजगारी दारिद्र्य काही कमी होत नाही म्हणून तो कर्जबाजारीपणा वैफल्यग्रस्त होतो होतो तो एखाद्यावर अन्याय झाला तर तो निमुटपणे सहन करतो अशा अन्यायग्रस्त शोषित कामगारांनी संघटित होऊन आपली आर्थिक परिस्थिती सुधारण्यासाठी सातत्याने प्रयत्नशील असले पाहिजे असे त्यांनी स्पष्ट केले.यावरून हे स्पष्ट होती की डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांनी कामगारांची संघटन हे महत्त्वाचे आहे हे तत्कालीन परिस्थितीमध्ये पटवून सांगितले होते. बाबासाहेब आंबेडकर म्हणतात कामगारांनी कारखान्यात अन्याय सहन करू नये आपल्या कामाचा योग्य मोबदला मिळाला पाहिजे सोयी सुविधा मिळाल्या पाहिजेत आपल्या हक्काचा उपयोग करून आपली स्थिती सुधारली पाहिजे प्रत्येक व्यक्तीच्या सर्वांगीण विकासासाठी लोकशाही प्रणाली आवश्यक आहे म्हणून कामगारांनी संप हे लोकशाही हत्याराचा उपयोग करून आपली आर्थिक स्थिती सुधारली पाहिजे. म्हणून त्यांनी संपाला अतिशय महत्त्वाचे स्थान या कामगार कल्याण विषयक दृष्टिकोनात दिल्याची दिसून येते. डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांनी कामगारांचे हि ता साठी भांडवलीशाही व समाजवादी अर्थव्यवस्थेला विरोध केला, ती नेहमीच स्वातंर्त्य समता, बंधुता, सामाजिक न्याय या मूलभूत मानवी शाश्वत मूल्यांचा पुरस्कार केलेला आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणतात की भांडवलशाही ही श्रमिकांची;गरिबांची शत्रू आहे संपूर्ण समस्येची मूळ आहे. भांडवलशाही कल्याणकारी अर्थव्यवस्था समाजव्यवस्था एका स्थानात बसणारच नाही म्हणून डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांनी कामगाराच्या हिताची कल्याणकारी अर्थव्यवस्था स्वीकारली ती भारतात रुजवली आहे. डॉ.बाबासाहेब आंबेडकर हे एक दूरदृष्टी कोणाची नेते होते कारण त्यांनी खाजगीकरणातून निर्माण होणा?्या आर्थिक विषमतेला तत्कालीन परिस्थितीमध्ये विरोध केला होता कोणत्याही देशात भांडवलदार लोक हे खाजगीकरण कसे अधिकाधिक करता येईल यासाठी प्रयत्नशील असतात. कारण कल्याणकारी कायद्याद्वारे कामगारांना सामाजिक सुरक्षा पुरविली जाते खाजगीकरणाद्वारे ती कल्याणकारी योजना संपुष्टात येते त्यामुळे कामगारांची आयुष्य धोक्यात येते आजच्या भारताच्या अर्थव्यवस्थेकडे बघून या असे दिसून येते की आज देशाची ७३% संपत्ती १% व्यक्तीकडे केंद्रित झाली आहे; त्यातून विदारक आर्थिक विषमता निर्माण झाली याची मुख्य कारण भांडवलदाराचा धरलेला खाजगीकरणाचा आग्रह आहे याच बाबासाहेब आंबेडकरांनी तत्कालीन परिस्थितीमध्ये विरोध केलेला दिसून येतो.

डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी एक कामगार नेता म्हणून केलेले कार्य उल्लेखनीय आहे त्यांनी कुळांची गुलामगिरी नष्ट करण्यासाठी खोत पद्धतीने नष्ट करून मुंबई प्रांतातील कोकणातील कुळांना शेती मिळविण्यासाठी विधेयक मांडले एवढेच नव्हे तर महार वतनी नष्ट केली अस्पृश्य जातीतील लोक आपल्या जातीनिहाय व्यवसाय सेवेचा भाग म्हणून अत्यंत हिन स्वरूपाचे काम महार वतनाद्वारे करत असत ती नष्ट करून सन्मानाने स्वाभिमानाने जगण्याचा मार्ग डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांनी कामगारांना दाखवला हे अतिशय मोलाचे कार्य होते. तत्कालीन परिस्थितीमध्ये कम्युनिस्ट कामगार चळवळ होती परंतु डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी कम्युनिस्ट कामगार चळवळीला विरोध केला कम्युनिस्ट कामगार विचाराच्या चळवळीत फक्त स्वतःचे हित साध्य करण्यासाठी ते कामगारांचा वापर करून घेतात हे स्पष्ट करून दाखवले म्हणून कामगारांचे प्रश्न सोडण्यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी स्वतंत्र मजूर पक्षाची स्थापना केली. डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांनी कामगार शेतमजूर यांना न्याय मिळवून देण्यासाठी त्यांच्या हिताचा रात्र दिवस विचार करणारा त्यांचे हक्क अधिकार प्राप्त करून देणारा असा कामगार पक्ष निर्माण केला कामगार शेतकरी शेतमजूर यांच्या न्याय मागण्यासाठी या पक्षाद्वारे त्यांनी मोर्चे काढले त्यात त्यांनी शेतावर काम करण्याच्या मजुरांची किमान वेतन ठरवावे . महसूल करातील सुटीप्रमाणे बाकी राहिलेल्या पैशात सूट द्यावी. शेतमालकाला भरपाई देऊन इनामदारी व खोती यासारख्या अनिष्ट पद्धती बंद करण्यासाठी कायदा करावा.

डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांनी फक्त शेतमजूर शेत कामगार यांच्यासाठीच कार्य केले नाही तर त्यांनी १९३८ मध्ये मनमाड येथे अस्पृश्य रेल्वे कामगारांच्या परिषदेत म्हणतात की स्पृश्य अस्पृश्य असा भेदभाव करता कामाने सर्व कामगारांनी एकत्र येऊन भांडवलशाहीच्या विरोधात बंद केला पाहिजे हा त्यांचा एक अतिशय महत्त्वाचा विचार होता. त्यात त्यांनी संपाचा पुरस्कार करून १९३८ च्या कायद्यानुसार कामगारांनी विशिष्ट परिस्थितीत संप करणे तर बेकायदेशीर ठरवले संपकर यांच्या विरोधात पोलीस कारवाई केली पोलीस बलाचा उपयोग करण्याचे ठरविले जाते तेव्हा मात्र याला विरोध म्हणून देशातील सर्व संघटनांनी एकत्रित करून त्यात स्वतंत्र मजूर पक्ष कम्युनिस्ट पक्ष ग्रीनी कामगार संघटना इत्यादी देशातील ६० संघटनेच्या सहकार्यांनी त्यांनी संप पुकारला होता आणि यातूनच त्यांनी कामगारांना न्याय मिळवून दिलेला होता हे त्यांचे कार्य अतिशय मोलाचे होते. डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर हे मध्ये मजूर मंत्री असताना निरीक्षण अशिक्षित कामगारांना नोकरी व नोकरीची माहिती भरती प्रक्रिया यासाठी माहिती देणारे सेवा कार्यालय स्थापन करण्यात यावे अशी शिफारस आणि तरतूद करण्यात आली होती ही तरतूद अतिशय महत्त्वाची होती. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी कामगारांच्या सर्वांगीण कल्याणचा विचार केला होता त्यांनी किमान वेतन कोणतेही क्षेत्रातील कामगार असो आरोग्य पगारी रजा याच्या तरतूद केली होती एवढेच नाही तर मालकांनी देखील कामगाराचा विचार करावा कामगारांना योग्य प्रमाणात वेळ

देऊन त्यांची कार्यक्षमता वाढविण्यासाठी सुसह्य परिरिथती निर्माण करावी अर्थात कामगारांचे शोषण करण्याची वरती सोडून कामगार कल्याणचा मार्ग स्वीकारावा अशी ही स्पष्ट केले होते. त्यांनी कामगारांना सुद्धा जाणीव करून दिली होती की कामगारांनी स्वतःची जबाबदारी ओळखून कर्तव्य जाणून कार्यक्षमपणे काम केले पाहिजे म्हणजेच काम चुकार वरती कामगारांनी सोडून दिली पाहिजे हे त्यांनी ठणकावून सांगितले होते.

डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर चे कामगार कल्याण विषयक धोरणात स्त्रियांचा सुद्धा विचार केलेला दिसून येतो स्त्री कामगारांना न्याय मिळवून देण्यासाठी त्यांनी १३ मार्च १९४५ रोजी केंद्रीय मंत्रिमंडळात खाणीत काम करणारे स्त्रियांचे प्रश्न सोडवून त्यांना न्याय मिळवून देण्यासाठी ऑल इंडिया वुमन्स कॉन्फरन्स स्थापना केली खाणीत काम करणाऱ्या स्त्रियांना न्याय मिळवून देण्यासाठी २९ मार्च १९४५ रोजी केंद्रीय मंत्रिमंडळात खान काम प्रस्तुती लाभ सुधारणा कायदा केला त्यात त्यांनी खाणीत काम करणाऱ्या स्त्री मजुरांना बाळंतपणाच्या काळात २८ दिवसाची प्रस्तुती भत्ता देण्यात यावा खाणीत काम करणाऱ्या स्त्री-पुरुषांना समान वेतन देण्यात यावे स्त्री कामगारांना १४ आठवड्याची प्रवृत्ती रजा देण्यात यावी तेही पगारी रजा जेणेकरून अशा अवघड अवस्थेत ती आर्थिक विवंचनेत बळी पडू नये याची काळजी डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांनी तत्कालीन परिस्थितीत घेतली होती यावरून हे स्पष्ट होती की डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांचे कामगार कल्याण विषयक दृष्टिकोन अतिशय महत्त्वाचा होता.

कामगार कल्याणच्या दृष्टिकोनातून असे दिसून येते की डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांनी आपल्या संपूर्ण आयुष्यात सुशीत दिन दलित कामगार मजूर यांच्या कल्याणासाठी संघर्ष केला आज ज्या काही कामगारांना सुविधा मिळतात त्यात त्यांची योगदान अनन्यसाधारण आहे हे स्पष्ट होते कामगार मग स्त्री असो पुरुष असो दोघांनाही संपूर्ण सामाजिक न्याय देण्यासाठी डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांनी अनेक उपाययोजना केले आहे त्या सर्व मानवीय दृष्टिकोनातून आहे खऱ्या अर्थाने कामगाराच्या श्रमाला प्रतिष्ठा प्राप्त करून देण्याचे कार्य त्यांनी केले हे स्पष्ट दिसून येते.

संदर्भ सूची :-

१) कांबळे रंजन; भगीरथ मानव संसाधन आणि मानव अधिकार
२) जाधव तुकाराम शिरापूरकर महेश मानवी हक्क द युनिक
३) भोसले के. एम. काटे के. बी. व्यवसायिक पर्यावरण फडके प्रकाशन
४) सपा. हनवते उत्तम अर्थतज्ञ डॉ. बाबासाहेब आंबेडकर अरुणा प्रकाशन लातूर
५) दंगलवाड डी.एम. सरोदे एन. युगपुरुष बाबासाहेब आंबेडकर शिवानी नांदेड